# NUTA BULLETIN

FORTNIGHTLY JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHER'S ASSOCIATION

Regd. No. ATI 263 *Licensed to post without prepayment No. ATI 10

YEAR : 24 ) 1st January, 1999 ( NO : 1

# A G E N D A

**of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS'ASSOCIATION to be held at 12.00 noon on *SUNDAY, the* 17th January,1999 at B. D. PARWEKAR MAHAVIDYALAYA, PANDHARKAWADA Dist. Yavatmal.**

Agenda of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association to be held at 12.00 noon on Sunday, the 17th January,1999 at B.D.Parwekar Mahavidyalaya, Pandharkawada Distt. Yavatmal, is as follows :-

## ITEM NO. 237 :
## *CONFIRMATION OF MINUTES :*

TO CONFIRM the minutes of the General Body meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on Sunday, the 17th May, 1998, at Shrimati Vimlabai Deshmukh Sabhagruha, Dr. Panjabrao Deshmukh Medical College, Shivaji Nagar, Amravati.

*Note :- Corrections, if any, were invited in the copy of the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association held at 12.00 noon on Sunday, the 17th May,1998 at Shrimati Vimlabai Deshmukh Sabhagruha, Dr. Panjabrao Deshmukh Medical College, Shivaji Nagar, Amravati. vide No.CIM/4 Dated 1.7.1998 published on page 43 of 1998 Nuta Bulletin. No correction was received.*

### विषय क्रमांक २३७ (अ)
### प्रा. सौ. कविताबाई सु. पाटील यांचे दुःखद निधन :

प्रा.रणजीत का.ठाकुर प्रा.कविताबाई सु. पाटील यांचे दुःखद निधनाबद्दल पुढील शोक प्रस्ताव **मांडतील** :-

"बा.बु.कला, ना.भ.वाणिज्य व बा.प.विज्ञान महाविद्यालय, दिग्रस. जि. यवतमाळ या महाविद्यालयातील अर्थशास्त्र विषयाच्या माजी प्राध्यापिका सौ.कविताबाई सु.पाटील यांचे दि. १८ ऑगस्ट १९९८ रोजी दुःखद निधन झाले. त्या नुटाच्या सक्रिय सदस्या होत्या. स्वभावाने मनमिळावु आणि कुशल अध्यापन यामुळे त्या सर्वत्र लोकप्रिय होत्या. त्यांच्या आत्म्यास सद्‌गती लाभो. अतएव श्रद्धांजली या सभेच्या वतीने त्यांना अर्पण करण्यात येत आहे." त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

### विषय क्रमांक. २३८ :
### प्रा.बी.टी.देशमुख व श्री. व्ही.यु.डायगव्हाणे यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव

कार्यकारी मंडळाच्या वतीने सचिव डॉ.इ.एच.कठाळे हे पुढील प्रस्ताव मांडतील.

(अ) दिनांक १३ नोव्हेंबर १९९८ ला झालेल्या निवडणूकीत अमरावती विभाग पदवीधर संघातून नुटाचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख हे लागोपाठ चौथ्यांदा महाराष्ट्र विधानपरिषदेवर फारमोठ्या मताधिक्याने निवडून आले आहेत, विधानपरिषदेवर लागोपाठ सातत्याने चौथ्या वेळेला पदवीधर मतदार संघातून निवडून जाणारे प्रा.बी.टी.देशमुख हे पहिले सदस्य आहेत, या निवडणूकीत ते निवडून आल्याबद्दल ही सभा अतिव आनंद व्यक्त करीत आहे. आणि त्यांचे मनापासून अभिनंदन करित आहे.

(ब) नागपूर विभाग शिक्षक मतदार संघातून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे श्री.व्ही.यु.डायगव्हाणे महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेवर लागोपाठ दुसऱ्यांदा निवडून आल्याबद्दल ही सभा अतिव आनंद व्यक्त करीत आहे आणि त्यांचे मनापासून अभिनंदन करित आहे.

### विषय क्रमांक. २३९ :
### अ.भा. स्तरावरील समझोत्याचे कार्यवृत्त व प्रत्यक्ष केंद्राच्या सुचना यामधील तफावत

कार्यकारी मंडळाच्या वतीने डॉ.इ.एच.कठाळे **पुढील प्रस्ताव मांडतील**

दिनांक ५ सप्टेबर १९९८ रोजी केंद्र शासनाचे शिक्षणमंत्री व अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष व महासचिव यांच्यामध्ये झालेल्या चर्चेचे जे कार्यवृत्त (यापुढे "कार्यवृत्त" असा उल्लेख) केंद्रीय शिक्षण सचिवांच्या सहीने अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांना देण्यात आले ते व त्या कार्यवृत्ताची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्रीय शिक्षण विभागाने निर्गमित केलेल्या ६ नोव्हेंबर १९९८ या तारखेच्या सूचना (यापुढे "केंद्रीय सूचना" असा उल्लेख) यांचे काळजी पूर्वक अवलोकन केले असता काही गंभीर बाबी स्पष्टपणे लक्षात येतात. त्या पुढील प्रमाणे :-

(१) कार्यवृत्तामध्ये "The Government has also agreed to

**NAGPUR UNIVERSIRY TEACHERS' ASSOCIATION**
**MEETING NOTICE : 2**
**Date : 01.01.1999**

From
**Prof.Dr.E.H.Kathale,**
Secretary, **NUTA,**
N-162 Reshim Bagh, Nagpur-440 009.
To,
**All the members**
of the Nagpur University Teachers' Association

Dear members,

I have the honour to inform you that in exercise of the powers conferred on it by Article VIII of the Constitution of NUTA, the Executive Committee has decided to have the meeting of General Body at **12.00 noon** on the date and at the place mentioned below.

2. Agenda of the General Body meeting is printed in this NUTA Bulletin. If you propose to suggest any amendments to any of the proposals/Resolutions included in the Agenda, you may send it to me within a period of one week from the date of the posting of this Bulletin. It will not be possible for the amendments received after the due date to be included in the additional agenda. Please send one copy of your amendment to Prof. B.T.Deshmukh, President NUTA, 3 Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati-444 604.

3. Rules for proposing amendments to the proposals/ resolutions are printed on page 97 of 1977 NUTA Bulletin. You are requested to kindly make it convenient to attend the meeting.

Yours faithfully,
Sd/- **E.H.Kathale,**
Secretary, NUTA

***Date and Place of the meeting***

**SUNDAY, the17th January, 1999**
**B. D. PARWEKAR MAHAVIDYALAYA,**
**PANDHARKAWADA Dist. Yavatmal.**

take up the issue of implementation of enhanced scales w.e.f. 01.01.96 with the Cabinet. " असा उल्लेख आहे व

केंद्रीय सूचनांच्या परिच्छेद १ (i) मध्ये "The revised scales mentioned in Annexure-I of our letter dated 27-7-1998 shall be effective from 1-1-1996. Accordingly, the Annexure-II enclosed with the letter referred to may be treated as withdrawn." असा उल्लेख आहे.

त्याचप्रमाणे कार्यवृत्तामध्ये "Government have further agreed to take up with the Cabinet the issue relating to the fixation of pay scales of Selection Grade Lecturers/Readers who were selected strictly in accordance with the rules and regulations framed by the UGC in consultation with the Government and who were in position as Selection Grade lecturers/Readers on 1.01.96 in a manner that they get their pay fixed at the minimum of Rs. 14,940/- as and when they complete 5 years in the grade." असा उल्लेख असून

केंद्रीय सूचनांच्या परिच्छेद 1 (ii) मध्ये "The Fixation of pay of lecturers(Selecation Grade)/Readers in the pre revised scale of Rs.3700-12-490-150-5700/-who were selected strictly in accordance with the rules and regulations framed by the UGC and who were in position as lecturers(Selection Grade) / Readers as on 1-1-1996, will be made in a manner that they get their pay fixed at the minimum of Rs. 14940/- in the revised scale of Rs. 12000-420-18300 as and when they complete five years in the grade." असा उल्लेख आहे. **याची ही सभा नोंद घेत आहे.**

(२) कार्यवृत्ताच्या परिच्छेद २ मध्ये "Government would be willing to consider the evolution of a scheme of professional development incentive in the form of cash allowance or assistance in kind or both to those lecturers who register for M.Phil/Ph.D. and whose pursuit of research is considered satisfactory by their guide. The nature and the details of the scheme would be discussed and finalised in consultation with the UGC." असा उल्लेख असून

केंद्रीय सूचनांच्या परिच्छेद ५ मध्ये सुद्धा "The UGC will formulate a scheme, in consultation with the Government, for giving professional development incentives in the form of cash allowances or assistance in kind or both to those Lecturers who register for M. Phil/Ph. D. and whose pursuit of research is considered satisfactory by their guides." असाच उल्लेख आहे. २ महिन्याचा कालखंड उलटल्यानंतरसुद्धा याबाबत कोणतीही कारवाई विद्यापीठ अनुदान आयोगाकडून होऊ नये **याबद्दल हे सभागृह तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

(३) कार्यवृत्ताच्या परिच्छेद ३ मध्ये "The Government has also declared that the UGC would prepare a specific scheme in consultation with the Government to reward and recognise meritorious teachers who may not be M.Phil or Ph.D. but who have made outstanding contributions in teaching and research. A preliminary communication indicating the views of AIFUCTO in this respect has been received from the UGC. The Scheme as finally formulated by the UGC would be expeditiously cleared by the Government and in any case within four weeks from the receipt of the finally formulated proposal from the UGC." असा उल्लेख असतांना प्रत्यक्ष केंद्रीय सूचनांमध्ये याबाबत कोणताही उल्लेख असू नये **ही अत्यंत निषेधार्ह बाब आहे** असे या सभागृहाला वाटते. यापुढील चार आठवड्यात विद्यापीठ अनुदान आयोगाने **याबाबतची योजना निश्चित करून केंद्रशासनाने याबाबतच्या सूचना निर्गमित कराव्यात अशी मागणी ही सभा करीत आहे.**

***नोटस् :-*** *दिनांक ५ सप्टेंबर १९९८ रोजी केंद्र शासनाचे शिक्षणमंत्री व अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष व महासचिव यांच्यामध्ये झालेल्या चर्चेचे कार्यवृत्त जे केंद्रीय शिक्षण सचिवाच्या सहीने अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांना देण्यात आले ते १९९८ च्या नुटा बुलेटीनमध्ये पृष्ठ ७७ वर प्रसृत केलेले आहे.*

*व त्या कार्यवृत्ताची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्रीय शिक्षण विभागाने निर्गमित केलेल्या ६ नोव्हेंबर १९९८ या तारखेच्या सूचना १९९८ च्या नुटा बुलेटीनमध्ये पृष्ठ १२५ वर प्रसृत केलेल्या आहेत.*

### विषय क्रमांक. २४० :
### विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठीच्या नविन वेतनश्रेणीची महाराष्ट्रात अम्मलबजावणी

कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा.सी.डी.कोंगरे **पुढील प्रस्ताव मांडतील**

पाचव्या वेतन आयोगाने १ जानेवारी १९९६ पासून लागू केलेल्या शिफारसी अमलात आणणारे आदेश केंद्र शासनाने सप्टेंबर १९९७ मध्ये निर्गमित केले असून त्याच शिफारसी १ जानेवारी १९९६ पासून महाराष्ट्रात शासकीय कर्मचारी व शिक्षकांना लागू करणारा शासन निर्णय डिसेंबर १९९८ मध्ये निर्गमित झालेला आहे. असे असतांना १ जानेवारी १९९६ पासून पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी महाराष्ट्रात लागू करणारा शासननिर्णय मात्र अजूनही महाराष्ट्र शासनाकडून निर्गमित होऊ नये याबद्दल ही सभा तीव्र खेद व्यक्त करीत आहे.

वस्तुतः विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना नवीन वेतनश्रेण्या लागू केल्याने येणाऱ्या अतिरिक्त अर्थभाराचा ८० टक्के हिस्सा केंद्र शासन सोसायला तयार आहे असे राज्य शासनाला केंद्र शासनाने स्पष्टपणे कळविले आहे. दिनांक २७ जुलै १९९८ व त्यानंतर ६ नोव्हेंबर १९९८ च्या पत्रान्वये केंद्र शासनाने राज्य शासनाला दिलेल्या सूचनांच्या आधारावर नवीन वेतनश्रेणी अमलात आणणारा शासननिर्णय तातडीने निर्गमित करावा अशी विनंती ही सभा महाराष्ट्र शासनास करीत आहे.

***नोटस् :-*** *दिनांक २७ जुलै १९९८ च्या केंद्र शासनाच्या सूचना १९९८ च्या नुटा बुलेटीनमध्ये पृष्ठ ७१ वर प्रसृत केलेल्या आहेत. त्यानंतर ६ नोव्हेंबर १९९८ च्या पत्रान्वये केंद्र शासनाने राज्य शासनाला दिलेल्या सूचना १९९८ च्या नुटा बुलेटीनमध्ये पृष्ठ १२५ वर प्रसृत केलेल्या आहेत.*

### विषय क्रमांक. २४१ :
### समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सवलत, निवृत्ती वेतन, प्रवास सवलत मिळणेबाबत

प्रा.ध.ग.गुडधे हे पुढील प्रस्ताव मांडतील.

समाजकार्य महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन, वैद्यकीय सवलत, प्रवास सवलत याबाबत ज्या सवलती अकृषि विद्यापीठातील संलग्नीत महाविद्यालयाच्या शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ज्याप्रमाणे लागू आहेत त्याप्रमाणे लागू करण्यात याव्या अशी मागणी ही सभा शासनाला करीत आहे.

### विषय क्रमांक. २४२ :
### समाजकार्य महाविद्यालयांना अनुदान मिळणेबाबत

प्रा.ध.ग.गुडधे हे पुढील प्रस्ताव मांडतील.

शासनाने मान्यता दिलेल्या विना अनुदान तत्वावर सुरू असलेल्या समाजकार्य महाविद्यालयांना "अनुदान" अकृषि विद्यापीठातील संलग्नीत महाविद्यालयांना ज्याप्रमाणे सुरू आहे त्याप्रमाणेच सुरू करण्यात यावे अशी मागणी ही सभा शासनाला करित आहे.

******

**RULES FOR PROPOSING AMENDMENTS**
**( Reproduced from page 97 of 1977 NUTA Bulletin )**

1. Any proposal before the meeting may be amended (a) by leaving out a word or words or (b) by leaving out a word or words in order to add or insert a word or words or (c) by adding or inserting a word or words.

2. An amendment to be in order shall : (a) not constitute a direct negative to the original resolution : (b) be relevent to and within the scope of the resolution to which it is moved.

# विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करणे.

*महाराष्ट्र विधानपरिषद : तिसरे अधिवेशन १९९८ : मंगळवार, २२ डिसेंबर १९९८*

**सर्वश्री. बी.टी.देशमुख, व्ही.यु. डायगव्हाणे, सुरेश पाटील, जयवंत ठाकरे यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

**श्री.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर)** : अध्यक्ष महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासाठी येणाऱ्या अतिरिक्त भाराच्या ८० टक्के भार राज्य शासनाला अदा करण्याची केंद्र शासनाने दाखविलेली तयारी, दिनांक २७ जुलै, १९९८ रोजी व त्यानंतर ६ नोव्हेंबर, १९९८ रोजी याबाबतच्या स्पष्ट सूचना केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभागाच्या शिक्षण खात्याने राज्य शासनाकडे पाठवून त्याबाबत कोणतीही कारवाई न होणे, त्या विरोधात महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालय शिक्षकांनी ११ डिसेंबर, १९९८ रोजी काम बंद आंदोलन पुकारणे, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणी महाराष्ट्रात लागू करण्याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

**श्री. दत्ता राणे (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री)** : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापतीः** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे निवेदन**

भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने दिनांक २७/०७/१९९८ रोजी केंद्र शासनाने पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनात सुधारणा करून राज्य शासनांनी या वेतनश्रेणीची अंमलबजावणी करण्याबाबतचा विचार करावा असे सुचविले होते. त्यानंतर केंद्र शासनाने दिनांक ६.११.९८ च्या पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगास दिनांक २७.७.९८ च्या योजनेत करण्यात आलेले बदल सुचविले होते व **या पत्राची प्रत राज्य शासनास दिनांक १७.११.९८ च्या पत्रान्वये अग्रेषित करण्यात आलेली आहे.** केंद्र शासनाकडून राज्य शासनास पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांच्या दिलेल्या वेतनश्रेणी संदर्भात राज्य शासनाकडून याबाबतची आवश्यक ती माहिती संकलित करून **आर्थिक भारासह प्रस्ताव सध्या तयार केला असून या प्रस्तावाची छाननी चालू आहे.** केंद्र शासन दिनांक १.१.९६ ते ३१.३.२००० या सालापर्यंत **वेतन पुनर्रचनेमुळे येणाऱ्या खर्चाच्या ८० टक्के खर्चाचे सहाय्य देणार आहे** व त्यानंतर या संपूर्ण खर्चाची जबाबदारी राज्य शासनाने स्विकारावयाची आहे. केंद्र शासनाच्या पत्रानुसार राज्य शासनाकडून कार्यवाही चालू आहे त्यामुळे या विभागाने त्यावर कोणतीही कार्यवाही केली नाही असे म्हणणे संयुक्तिक ठरणार नाही असे वाटते. प्रस्तावाची छाननी झाल्यावर व प्रस्तावास शासनाने मंजुरी दिल्यावर याबाबतचे जरूर ते आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही विभागाकडून करण्यात येईल.दिनांक ११.१२.१९९८ रोजी विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांनी त्यांच्या मागण्यांसंदर्भात हे आंदोलन केले होते.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, जे निवेदन वितरीत करण्यात आलेले आहे त्यामध्ये विद्यापीठातील आणि महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतनश्रेणीच्या पुनर्रचनेचा प्रश्न आहे. हा विषय असा आहे की, ज्याच्यामध्ये ८० टक्के अर्थभार केंद्र सरकार सहन करणार आहे. **केंद्र शासनाची दोन पत्रे मिळाल्याचे निवेदनात मान्य करण्यात आलेले आहे.** "केंद्र शासनाच्या पत्रानुसार राज्य शासनाकडून कार्यवाही चालू आहे" असेही म्हटले आहे. तरी माझा पहिला प्रश्न असा आहे की, **२७ जुलै, १९९८ आणि ६ नोव्हेंबर १९९८ च्या पत्रान्वये कळविलेल्या वेतनश्रेण्या आहेत त्या कोणत्या तारखेपासून महाराष्ट्रामध्ये अमलात येणार आहेत?**

**श्री. दत्ता राणे** : अध्यक्ष महाराज, लेखी निवेदनामध्ये कालमर्यादेसंबंधी उल्लेख करण्यात आलेला नाही. महाराष्ट्रातील २७ हजार शिक्षकांचा हा प्रश्न आहे. १-१-१९९६ ते ३१-३-२००० सालापर्यंत ९०० **कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी केंद्र सरकारकडून ८० टक्के म्हणजे ७२० कोटी रुपये मिळणार आहेत आणि राज्य सरकारचे २० टक्के म्हणजे १८० कोटी रुपये होतात.** २००० सालानंतर ही योजना राबविण्याकरता प्रत्येक वर्षासाठी महाराष्ट्र शासनाने २११ कोटी रुपयांची तरतूद करून ही योजना पुढे चालू ठेवावयाची आहे. आरोग्य खाते, कृषी खाते आणि इतरही काही खात्यांमध्ये अशा प्रकारचा प्रश्न आहे. ६ तारखेला जे त्यांनी पत्र पाठविले होते त्या पत्रात त्यांनी असे म्हटले आहे की या योजनेसंबंधी काही अडचणी येत असतील तर केंद्र सरकारकडे त्याबाबत विचारविनिमय करावा. खात्याने सगळी तयारी करून हा प्रस्ताव वित्त विभागाकडे दिला. वित्त विभागाकडून या प्रस्तावावर छाननी सुरू झाली आहे. त्याचबरोबर निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, या प्रस्तावास शासनाने मंजुरी दिल्यानंतर याबाबतचे जरूर ते आदेश निर्गमित करण्यात येतील. तेव्हा या संदर्भात मी आपल्याला शासनाच्या वतीने अशी विनंती करतो की वेळ काही आज सांगता येणार नाही. **म्हणूनच मी लवकरात लवकर हा शब्द वापरतो.** म्हणून १.१.१९९६ पासून लागू केले पाहिजे अशी शिफारस करू. परंतु शेवटी कॅबिनेट यासंबंधी निर्णय घेणार असल्यामुळे त्याअगोदर उत्तर देता येणार नाही.

**श्री.अशोक मोडक** : लक्षवेधीचे निवेदन वाचल्यानंतर आणि त्यावरील उत्तरे ऐकल्यानंतर सदनाचे असे मत झाले आहे की, केंद्र सरकारच्या पत्रानुसार **राज्य शासनाकडून याबाबत आतापर्यंत कारवाई झाली नाही. त्यासंबंधी फक्त चर्चा आणि चिंता व्यक्त झाली.** या ठिकाणी उत्तर देण्यात आले आहे त्यात कार्यवाहीचा अर्थ इंम्पलिमेंटेशन असे मानायला मी तयार नाही. कारण याबाबत ठोस निर्णय झाला नाही म्हणून दुर्दैवाने हा विषय आला आहे. मंत्रिमहोदयांच्या एका वाक्याशी मी सहमत आहे, नोव्हेंबरच्या अमूक तारखेला हे पत्र आले, त्यावेळी पुरेसा वेळ नव्हता त्याबाबत त्यांनी अडचण सांगितली हे ठीक आहे. तेव्हा याबाबत चर्चा झाल्याशिवाय जोपर्यंत निर्णायक अशाप्रकारचा विचार होत नाही तोपर्यंत या चर्चेला पूर्णविराम मिळेल असे म्हणता येणार नाही.

**श्री.दत्ता राणे** : मी सुरुवातीला यासंबंधी सांगितले आहे आणि माझा याबाबतचा विचार पक्का आहे. कारण हा वित्तभाराचा प्रश्न आहे. म्हणून याबाबत कॅबिनेटसमोर विचार झाला पाहिजे. त्यामध्ये दुसऱ्या खात्याचा प्रश्न देखील आहे. त्यामुळे यामध्ये पॅकेज डीलमध्ये देण्यासंबंधीची अट आहे. म्हणून त्याबाबत एकत्रित विचार केल्याशिवाय कोणताही निर्णय घेता येणार नाही. याठिकाणी आपण सर्वांनी जे विचार व्यक्त केले आहेत ते मी कॅबिनेटसमोर आणीन. परंतु त्याबाबत आता उत्तर देता येणार नाही.

**सभापती** : ही लक्षवेधी सूचना संपण्यापूर्वी मी त्याबाबत शासनाला निर्देश देत नाही किंवा शासनाला निर्देश देवून अडचणीत आणीत नाही परंतु यासंबंधी माझे अभिप्राय मी स्पष्टपणे व्यक्त करतो. यासंबंधी इतका वेळ लागल्यानंतर सुद्धा आपल्याला ही वेतनश्रेणी १.१.१९९६ पासून द्यावी लागणार आहे हे माहीत आहे. ती न देण्याच्या बाबतीत शासनाने निर्णय केला तर त्या विरोधात न्यायालयीन प्रक्रिया यापूर्वी झाली आहे तशी यापुढील काळात झाल्याशिवाय राहणार नाही. देशभरच्या प्राध्यापकांनी यासंबंधी ४७ दिवस संप केला आहे. आणि केन्द्रीय शिक्षण मंत्र्यांनी ही गोष्ट मान्य केली आहे. राज्य सरकारकडे याबाबतीत पत्र आले आहे. त्यासंबंधी प्रत्यक्ष कार्यवाही व्हायला वेळ लागेल. **कारण पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींप्रमाणे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना जे वेतन अमुक तारखेपासून द्यावे लागणार आहे ते देण्याच्या बाबतीत शासनाने तत्त्वतः अशाप्रकारचा निर्णय घेतला आहे. त्याबाबत प्रत्यक्ष कार्यवाहीला वेळ लागणार असला तरी तशाप्रकारे तत्त्वतः निर्णय घेण्यात आला होता. आणि म्हणून यासंबंधी तशाप्रकारे तत्त्वतः निर्णय घेणे आवश्यक होते तो झालेला नाही ही गोष्ट बरोबर झाली नाही.** यासंबंधी आपल्याला जेंव्हा केव्हा निर्णय करायचा असेल तेव्हा तो आपण करू शकता.

**श्री.व्यंकाप्पा पतकी** : सभापती महोदय, या ठिकाणी निश्चित कालावधी कळला पाहिजे.

**सभापती** : मी ते बंधनकारक करीत नाही.

**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, आपण आपला अभिप्राय

# माध्यमिक शाळांना १ जून १९९७ पासून अनुदान न मिळणे.

*महाराष्ट्र विधानपरिषद : तिसरे अधिवेशन १९९८ : गुरुवार, १७ डिसेंबर १९९८*

**सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख,सुरेश पाटील,जयवंत ठाकरे,व्यकंप्पा पतकी यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

**श्री. व्ही.यू.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) :** अध्यक्ष महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. आणि त्या बाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" राज्यातील विना अनुदानीत माध्यमिक शाळा टप्या-टप्याने त्या-त्या वर्षाच्या जून महिन्यापासून अनुदानावर आणण्याच्या शासन निर्णयाप्रमाणे ५१८ माध्यमिक शाळांचे १ जून १९९७ पासुनचे अनुदान १४ कोटी, ४९ लाख, १९९७ पूर्वीचे ११ कोटी, १९९८-९९ मधील ८ कोटी ७० लाख असे एकूण ३४ कोटी ९८ लाख रुपये ३ महिन्यांमध्ये सर्व संस्थांना देण्याचे दिनांक २८ जुलै १९९८ रोजी सभागृहात मान्य करूनही सदरहू शाळांची यादी जाहीर करून संस्थांना अद्याप अनुदान मंजूर न करणे, त्यामुळे कर्मचाऱ्यावर उपासमार ओढविणे, शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेले गंभीर/चिंतेचे वातावरण या बाबत शासनाने केलेली या करावयाची उपाययोजना."

**श्री.सुधीर जोशी (शालेय शिक्षण मंत्री) :** सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**मा.शालेय शिक्षणमंत्री यांचे निवेदन**

राज्यात नवीन माध्यमिक शाळा उघडण्यास खाजगी शिक्षण संस्थांना शासनाकडून परवानगी देण्यात येते. ही परवानगी केवळ इ. ८ वी चा वर्ग उघडण्याकरिता असते, व ती विना अनुदान तत्त्वावर दिली जाते.

शासनाच्या दिनांक १०.२.१९८९ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार शाळेची तपासणी झाल्यानंतर सदर शाळा निकषपात्र ठरल्यास निधीच्या उपलब्धतेनुसार ४ थ्या वर्षी २५% , ५ व्या वर्षी ५०% , ६ व्या वर्षी ७५% व ७ व्या वर्षी १००% अनुदानावर आणण्यात येते. आदिवासी क्षेत्रातील शाळा व मुलींच्या शाळा यांना मात्र ४ थ्या वर्षीच १००% अनुदान दिले जाते.

सन १९९७-९८ साली उपलब्ध झालेला निधी सन १९९६-९७ साली निकषपात्र ठरलेल्या शाळांना अनुदान देण्यासाठी वापरला गेल्याने, सन १९९७-९८ साली निकषपात्र ठरलेल्या शाळा अनुदानावर आणता आल्या नाहीत, त्यामुळे त्यांची यादी अद्याप जाहीर झाली नाही.

सन १९९८-९९ या शैक्षणिक वर्षात अनुदान देण्यासाठी शाळांचे मूल्यांकन अद्याप पूर्ण व्हावयाचे आहे. त्यामुळे निकषपात्र ठरणाऱ्या शाळांची यादी अद्याप तयार झाली नाही. हाच प्रश्न लक्षवेधी सूचनेव्दारे दिनांक २८ जुलै,१९९८ रोजी विधान परिषदेत चर्चीला गेला होता. त्यावेळी चर्चेअंती मा.सभापती विधान परिषद यांनी शासनास खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

"येत्या तीन महिन्याच्या आत निकाप्रमाणे अनुदानास पात्र असणाऱ्या माध्यमिक शाळांची यादी जाहीर करण्यात यावी व त्यांना दि.१०.२.८९ च्या शासन निर्णयाप्रमाणे अनुदान देण्यात यावे."

शाळांना अनुदान देण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे. अनुदान प्राप्त शाळांची यादी, त्यानंतरच जाहीर करण्यांत येईल.

**श्री.व्ही.यु.डायगव्हाणे :** सभापती महोदय, या ठिकाणी निवेदनातील शेवटचा पॅरा सोडून वर जे सांगितले आहे ते सर्व जी.आर.मध्ये आहे. या बाबत २८ जुलै,१९९८ रोजी चर्चा झाली होती. या ५१८ शाळांच्या संदर्भात चर्चा झाली होती. अनेक वर्षापासून विना अनुदानाचे सुत्र चालू आहे. टप्प्याटप्प्याने या शाळांना अनुदान देण्याची प्रक्रिया आहे. या बाबत दि.१०.२.१९८९ चा जी.आर. आहे. ५१८ शाळांच्या बाबतीत मा. सभापतींनी जे निर्देश दिले आहेत., ते मी वाचून दाखवीत आहे. परंतु आता उत्तर चुकीचे दिले आहे. मा.सभापतींनी त्यावेळी जे निर्देश दिले आहेत ते मी वाचून दाखवितो. राज्य कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ केल्यानंतर कशी व्यवस्था करता? या बाबतचा निर्णय झाला तेव्हा बजेटमध्ये कशी तरतूद होती.? ज्या जुन्या बाबी आहेत त्याचां बजेटमध्ये समावेश झाला पाहिजे. अंतर्भाव झाला पाहिजे. बजेटमध्ये त्याची व्यवस्था झाली पाहिजे. नवीन घोषणेच्या बाबतीत नंतर व्यवस्था करावी. मा. सभापतींनी पुढे असे निर्देश दिले आहेत की, तीन महिन्याच्या पूर्वी अनुदान पात्र ज्या ज्या शाळा आणि शिक्षण संस्था आहेत त्या शाळांना तसेच शिक्षण संस्थांना अनुदान दिले जाईल अशी शासनाने व्यवस्था करावी. या शाळांची यादी देखील जाहीर करण्यात यावी. परंतु आता जे उत्तर दिले आहे, ते दिशाभूल करणारे उत्तर दिले आहे. या ५१८ शाळांना १.६.९७ पासून अनुदान देण्यात आलेले नाही. माझा या ठिकाणी असा प्रश्न आहे की, या ५१८ शाळांची यादी हे अधिवेशन संपण्यापूर्वी जाहीर करण्यात येईल काय?

**श्री. सुधीर जोशी :** सभापती महोदय, या ठिकाणी जे उत्तर देण्यात आले ते बरोबर आहे. १९९६-९७ च्या निकषपात्र शाळा १९९७-९८ ला अनुदान घेता येत नाही अशी परिस्थिती आहे. आता याची व्यवस्था करण्याचा प्रयत्न सुरू आहे. जेव्हा या बाबतीत निधी उपलब्ध होईल, तेव्हा तो देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** सभापती महोदय, या ठिकाणी दोन्ही प्रश्नांचे उत्तर आले नाही. निकषपात्र झालेल्या शाळांना अनुदान देण्याबाबत तसेच त्यांची यादी प्रसिद्ध करण्याबाबत ३ महिन्यांची मुदत दिली आहे. तसे मा.सभापतींचे निर्देश आहेत. सभापती महोदय या ५१८ शाळांची यादी जी शासनाने झाकून ठेवली आहे. ती यादी हे अधिवेशन संपण्यापूर्वी उजेडात आणील काय ? या ५१८ शाळांच्या अनुदानाचा हा प्रश्न आहे. त्यांना एक महिन्याच्या आत निधी उपलब्ध करून त्यांच्यापर्यंत पोहोचता केला जाईल काय ?

**श्री. सुधीर जोशी :** या शाळांचे मूल्यांकन सुरू असल्यामुळे ही यादी अजून तयार झाली नाही.

**श्री. बी.टी.देशमुख :** मा. मंत्री महोदय, ज्या पद्धतीचे उत्तर देत आहेत ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. वित्त विभागाच्या संमतीने शालेय शिक्षण विभागाचा १०.२.८९ चा जी.आर. निघाला. त्यामध्ये दिलेल्या निकषाप्रमाणे या शाळांना अनुदान द्यायचे आहे. याबाबत २८ जुलै १९९८ ला सभागृहात प्रश्न चर्चेला आला होता. त्या प्रश्नाचा नोटीसमध्येही उल्लेख केला होता. त्यावेळी शासनाने केलेल्या निवेदनातील चार-पाच परिच्छेद जसेच्या तसेच आजही या ठिकाणी निवेदनामध्ये दिले आहेत. त्यामध्ये एका शब्दाचाही फरक नाही. तेव्हा शासनाच्या निर्णयाप्रमाणे हे द्यायचे आहे. त्याकरिता दोन-चार महिने मी समजू शकतो. परंतु दोन-तीन वर्षे लागतात, तरीही होत नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. १९ महिने झाले त्यांनी निकष पूर्ण केले, तरीही त्यांना अनुदान दिले नाही. त्यावेळी मा.सभापतींनी सुद्धा सांगितले होते. **"पैसे मिळायला एक-दोन महिने वेळ लागला तर समजू शकतो. तरीही तीन महिन्याच्या आंत या अनुदानपात्र शाळांना शासनाकडून अनुदान जाईल अशाप्रकारची व्यवस्था करावी." त्यावेळी आपण "होय" असे म्हणालात, याबाबत वित्त विभागाने एकदा संमती दिल्यानंतर सुद्धा तुम्हाला पुन्हा त्याचे पाय धरावे लागतात का ?** एकदा शासन निर्णय झाल्यानंतर त्याची अंमलबजीवणी झाली पाहिजे. १९ महिने आपण या ५१८ शाळांना तिष्ठत ठेवले आहे हे बरोबर नाही. त्याकरिता तीन-चार वेळा सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित करावा लागणे बरोबर नाही. तेव्हा पुढील तीन ते चार दिवसात या शाळांची यादी जाहीर करून त्यांना अनुदान द्याल काय?

---

दिला असल्यामुळे आम्ही सभात्याग करीत नाही. आपण शासनाला आदेश दिला नाही. निदेश दिला नाही. आपण आपला अभिप्राय व्यक्त केला. त्याचे महत्त्व आम्हाला कळते. त्यांनाही कळावे.मी या ठिकाणी दोन गोष्टींच्या बाबतीत निषेध व्यक्त करतो. **२७ जुलै १९९८ ला पत्र आले की ८० टक्के केंद्र शासन मदत देईल. तरीही अजून यांचा निर्णय झाला नाही. तो निर्णय केव्हापासून अंमलात येणार हेही सांगत नाहीत.** त्याबद्दल मी निषेध व्यक्त करतो. त्याचप्रमाणे पुढील अधिवेशनापर्यंत निर्णय करण्यासंबंधी देखील ते हो म्हणत नाहीत. दरवेळेला लोकांनी संप केल्यानंतरच आपण निर्णय घेणार काय? शासनाच्या या वृत्ती बद्दल मी निषेध व्यक्त करतो. **खरे म्हणजे आम्ही सभात्यागच करणार होतो. पण आपल्या अभिप्रायाचे महत्त्व लक्षात घेता यांच्या या धोरणाबद्दल आम्ही निषेध व्यक्त करतो.**

******

कारण या बाबत वित्त विभागाची अडचण सांगणे बरोबर नाही. त्याबाबत वारंवार आदेश देवून सुद्धा आणि मा. मंत्रिमहोदयांनी सभागृहात कबूल केले असतांनाही ही गोष्ट होत नाही हे बरोबर नाही. तेव्हा ही गोष्ट सोमवारपर्यंत करण्यामध्ये काय अडचण आहे.

**श्री. सुधीर जोशी :** निधी उपलब्ध झाल्यावर लगेच करण्यात येईल.

**श्री. बी.टी.देशमुख :** म्हणजे निधी उपलब्ध होईपर्यंत त्यांनी मरण रोखून ठेवायचे काय ? या ठिकाणी झालेल्या चर्चेच्यावेळी फंड उपलब्ध होईल काय ? असा प्रश्न विचारला असता **त्यावेळी तुम्ही "होय" म्हणालात. "तीन महिन्यामध्ये करतो" असे सहा महिन्यापूर्वी म्हणालात.** वित्त विभागाच्या संमतीने त्याबाबतचा १०.२.८९ चा शासन निर्णय निघाला. ग्रामीण विभागातील संस्थांचा जीव घेणारे तुमचे हे अधिकारी कोण आहेत?

**श्री. सुधीर जोशी :** मघाशी सांगितल्याप्रमाणे ९६-९७ मध्ये निकषपात्र ठरलेल्या शाळांना अनुदान देण्यासाठी ९७-९८ चा फंड वापरावा लागला. त्यांनी मागणी केली म्हणून तो वापरावा लागला. त्यामुळे हा फंड कमी पडत आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** शासन निर्णयाप्रमाणे त्यांना फंड मोजता येत नसेलतर त्या वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांना आपण सस्पेंड करा. कशासाठी हे अधिकारी पोसता? **शासन निर्णयाप्रमाणे त्यांना जर कॅलकुलेशन करता येत नसेल तर त्यांना हाकला ना ? तुमच्या शासनाचा हा निर्णय आहे. हे कसे राज्य चालले आहे?** तुमचे निकष आहेत, तुम्ही कबूल केले आहे. माझे म्हणणे असे की, वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांना हे कॅलकुलेशन करता आले नाही त्यांना सस्पेंड करण्यामध्ये अडचण काय ? राज्याचे मा.मुख्यमंत्री या ठिकाणी बसले असतांनाही निर्णय होत नाही. त्यांना आपण सस्पेंड कां करत नाही ? त्यांना कॅलकुलेशन जमत नाही तर त्यांना क्लास वन वर कां ठेवता याचे उत्तर द्या?

**श्री. सुधीर जोशी :** ही बाब जिल्हा स्तरीय असल्यामुळे डी.पी.डी.सी.मध्ये तरतूद करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. डी.पी.डी.सी. मध्ये तरतूद केल्यानंतर लवकरात लवकर करण्यात येईल.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदय, हे काय बोलत आहेत?

**श्री.व्ही.यु.डायगव्हाणे :** येथे डीपीडीसीचा काही संबंध नाही.

**श्री.बी.टी.देशमुख :** डीपीडीसीचा संबंध आहे तर गेल्या वेळेला सुचले नाही का? डीपीडीसी आली कोठून? कोणत्या जी.आर.मध्ये आहे? १९८९ च्या जी.आर.मध्ये आहे काय? डीपीडीसी कोठून आली आहे याचे उत्तर पाहिजे.

**श्री.सुरेश पाटील :** सभापती महोदय, आमच्या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही.

**श्री.अरुण मेहता :** सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. याठिकाणी गेल्या सभेमध्ये जे निदेश मा. सभापती महोदयांनी दिले आणि त्याला "होय" असे उत्तर माननीय मंत्रीमहोदयांनी दिले. आता "होय" म्हणून उत्तर दिल्यानंतर या ५१८ शाळा सगळ्या निकषांना उतरतात आणि त्यांना त्याप्रमाणे १९९७ पासून अनुदान देणे हे शासनावर बंधनकारक आहे. हा विषय दुसऱ्यांदा आणि आज तिसऱ्यांदा या सदनामध्ये येत आहे. म्हणून जे आश्वासन स्पष्टपणे "होय" या शब्दात दिले जाते, ते जर पाळले गेले नाही तर याचा अर्थ हे केवळ शब्द फेकले जातात असा होईल.

**श्री.सुरेश पाटील :** नुसते आश्वासन नाही तर माननीय सभापतींचे निदेश आहेत.

**श्री.अरुण मेहता :** मी हरकतीचा मुद्यावर बोलत आहे आणि आपल्याला मदतच करीत आहे. सभापती महोदय, आपणांकडून दिलेल्या निदेशांची अंमलबजावणी होणार नसेल, "होय" म्हटल्यानंतर, आपली पिठासीन अधिकाऱ्यांची या सदनातील सर्वोच्च भूमिका आहे, त्यालाच काटशह देण्याचे काम शासनाकडून होत आहे. हे सहन करता कामा नये. आपण स्पष्टपणे शासनाला निदेश जसेच्या तसे पुन्हा देवून येत्या आठवड्यात हे अनुदान दिले जाईल, यासंबंधीचे निदेश दिले जाणे अत्यंत आवश्यक आहे. याच्यावर प्रक्षोभक भूमिका आहे. तिला चेतविणे हे या सभागृहाच्या दृष्टीने बरोबर नाही. आपल्या निदेशाबरहुकुम पालन व्हावे, नाही तर हा अवमान, प्रतिष्ठा, शान घालविणारा शासनाचा निर्णय ठरेल.

**उप सभापती :** माननीय मंत्रीमहोदय, ज्या शाळांना अनुदान कबूल केले आहे त्याच्यामध्ये ज्या काही अडचणी आहेत, **त्याच्यातून मार्ग काढून १५ दिवसात हे अनुदान द्यावे असे निदेश मी देत आहे.** कृपया त्याची अंमलबजावणी करावी.

**श्री.सुधीर जोशी :** सभापती महोदय, माननीय सभापतींनी निदेश दिले, ते पूरे केले नाही, यासंबंधीची ही चर्चा आहे. म्हणून माझी एवढीच विनंती आहे की, याबाबतीत वेळेचे बंधन न घालता लवकरात लवकर जेवढे करता

## महाराष्ट्र शासन

### *क्रमांक : संकीर्ण २०९८/(४६११)/विशि-४*

### उच्च व तंत्रशिक्षण विभाग

*मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ : दिनांक २ डिसेंबर १९९८*

प्रति,

१. कुलसचिव सर्व विद्यापीठे (अभिमत विद्यापीठासह)
२. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) म.रा.पुणे
३. शिक्षण संचालक (तंत्रशिक्षण) म.रा.मुंबई
४. सर्व विभागीय सहसंचालक (उशि)
५. सर्व विभागीय सहसंचालक (तंत्रशिक्षण)

**विषय :** वाहन खरेदी व पदनिर्मितीवरील बंधने.... वित्त विभागाचा दिनांक २ जून १९९८ चा शासन निर्णय

महोदय,

उपरोक्त विषयाचे या विभागाचे पत्र क्रमांक संकीर्ण २०९८/(४६४१)/ विशि- ४ दिनांक १३.७.९८ कृपया पहावे.

२. दिनांक २.६.१९९८ च्या विषयोक्त शासन निर्णयाच्या संदर्भात विविध विद्यापीठांकडून तसेच क्षेत्रिय कार्यालयाकडून करण्यात आलेल्या विचारणेच्या संदर्भात खालील खुलासा करण्यात येत आहे.

दिनांत २.६.१९९८ पूर्वी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयाच्या आस्थापनेवर कार्यभाराच्या /विद्यार्थीसंख्येच्या मान्य निकषानुसार मंजूर असणारी शिक्षक व शिक्षकेतर पदे रिक्त झाल्यावर ती तात्पुरती किंवा नियमित स्वरूपात नियुक्ती देऊन भरण्यास वित्त विभागाच्या वरील आदेशान्वये बंधने घालण्यात आलेली नाहीत ज्या विभागात पदांचा आढावा घेतलेला नाही त्या विभागांना वित्त विभागाच्या दिनांक २ जून १९९८ च्या आदेशान्वये निर्गमित केलेल्या सूचना लागू आहेत. शिक्षक संवर्गातील पदे ही विद्यापीठ/विद्यापीठ अनुदान आयोग/अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद इत्यादी संस्थांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश विचारात घेऊन भरली जातात. अर्हता प्राप्त उमेदवार उपलब्ध न झाल्याने ही पदे तात्पुरत्या स्वरूपात/तदर्थ स्वरूपात भरली जात असल्याने प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस ही रिक्त पदे भरण्याची कार्यवाही विद्यापीठे/ महाविद्यालायांकडून केली जात असतेच मात्र विहित कार्यपद्धतीने पदे भरण्यास जास्त कालावधी लागतो. **तरीही विहित कार्यपद्धती आखून कायम स्वरूपात दिनांक २.६.१९९८ पर्यंत मंजूर असलेली शिक्षक /शिक्षकेतर पदे सर्व विद्यापीठात संलग्नित महाविद्यालयात भरण्यास कुठलीही हरकत नाही.**

३. १९९८-९९ या शैक्षणिक वर्षात कार्यभारानुसार/मान्य निकषानुसार विद्यापीठे/संलग्नित महाविद्यालये याच्या आस्थापनेवर मान्य होणारी व सरळ सेवा भरतीने भरावयाची अतिरिक्त नवीन पदे शासन निर्णय वित्त विभाग दिनांक २.६.१९९८ मधील तरतुदीनुसार भरण्याबाबतची कार्यवाही करावयाची आहे. शिक्षक संवर्गातील पदे ही तासिका तत्त्वावर भरावयाची आहेत व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत या विभागाकडून वित्त विभागाच्या मान्यतेचे स्वतंत्र आदेश निर्गमित झाल्यावरच नियमित नियुक्तीची कार्यवाही करावयाची आहे. तथापि या पदांवर अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सामावून घ्यावयाचे असल्यास अशी कार्यवाही करण्यास शासनाची मान्यता आहे.

४. वरील वित्त विभागाच्या आदेशाच्या अनुषंगाने काही मुद्यांवर विद्यापीठांनी स्पष्टीकरण मागविलेले होते हे स्पष्टीकरण विभागाकडे प्रलंबीत असल्याने दरम्यानच्या कालावधीत पदे न भरता रिक्त ठेवली गेली असल्यास **या कालावधीपुरती पदे रिक्त असल्याने ती व्यपगत होण्याचा कालावधी अर्थात सहा महिन्यांमध्ये जोडून धरण्याची आवश्यकता नाही.**

५. कृपया उपरोक्त सूचना सर्व अशासकीय संलग्नित महाविद्यालयांच्या निदर्शनास आणाव्यात व **विहित पद्धतीचा अवलंब करून पदे भरण्याची कार्यवाही करण्यात आली आहे याची सर्व संबंधीतांनी खात्री करून घ्यावी.**

आपली विश्वासू
(दी.अ.कारेकर)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत : सहसचिव (तंशि) उपसचिव (उशि) यांचेकडे माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

येईल तेवढे करू.

**श्री अरुण मेहता :** सभापती महोदय, आपण निदेश दिलेले आहेत. आता मागे कसे जाता येईल.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, एक गोष्ट मी आपल्या लक्षात आणून देवू इच्छितो की, याची सर्व यादी तयार आहे. ती सादर का करीत नाहीत ? कशासाठी लपवून ठेवता.?

**श्री. सुधीर जोशी : ही यादी तुम्हाला दोन दिवसात देवू.**

**श्री.छगन भुजबळ :** सभापती महोदय, हा प्रश्न वारंवार या सभागृहामध्ये

## १९९७-९८ पासून अनुदानासाठी पात्र असलेल्या शाळांची यादी सभागृहासमोर ठेवणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : तिसरे अधिवेशन १९९८ : गुरुवार, २४ डिसेंबर १९९८*

**मा. सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार मा. शालेय शिक्षण मंत्र्यांनी केलेले निवेदन**

**श्री. सुधीर जोशी (शालेय शिक्षण मंत्री) :** महोदय, मी आपल्या अनुमतीने १९९७-९८ पासून अनुदानासाठी पात्र असलेल्या शाळांची यादी सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती :** अनुदानासाठी पात्र असलेल्या शाळांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

### विवरण पत्र : अनुदानासाठी विहित केलेल्या निकषांची पूर्तता करणाऱ्या शाळांची यादी (१९९७-९८)

**जिल्हा : नागपूर**

४०८. श्रीराम विद्यालय सोनेगाव, सोनेगाव, ता.कळमेश्वर, जि.नागपूर

४०९ . राणी चित्रलेखा राजे भोसले विद्यालय, खैरी (वुटी), ता.उमरेड, जि.नागपूर.

४१०. नवजीवन लोक विद्यालय, इसापूर खु., ता. काटोल, जि.नागपूर.

४११. शिंदे कन्या विद्यालय, पंचवटी, काटोल, ता.काटोल, जि.नागपूर.

४१२. दादासाहेब खडसे विद्यालय, नागपूर, ता.जि.नागपूर.

४१३. इंदूताई मेमोरियल हायस्कूल,वायगाव, ता.मौदा, जि.नागपूर.

४१४. वलनी हायस्कूल, वलनी, ता.सावनेर, जि.नागपूर

४१५. श्रीकृष्ण विद्यालय, सावंगी,आसोला, ता.हिंगणा, जि.नागपूर.

४१६. रूई माध्यमिक विद्यालय, रुई, ता.जि.नागपूर.

४१७. भिलगाव माध्यमिक विद्यालय,भिलगाव, ता.कामठी, जि.नागपूर.

४१८. बॅ.शेषराव वानखेडे माध्यमिक विद्यालय, देवळी-पेंढरी, ता.हिंगणा, जि.नागपूर.

४१९. श्रीकृष्ण विद्यालय, मंगसा, ता.सावनेर, जि.नागपूर.

४२०. गुरुकृपा विद्यालय, आंभोरा, ता.कुही, जि.नागपूर.

**जिल्हा : भंडारा**

४२१. बहुउद्देशीय हायस्कूल, अर्जूनी/मोर, ता.अर्जूनी/मोर, जि.भंडारा.

४२२. संत जयरामदास विद्यालय, ठाणा ता.आमगांव, जि.भंडारा.

४२३. सुबोध विद्यालय, मासळ, ता.लाखांदूर, जि.भंडारा.

४२४. हरिकृष्ण विद्यालय, कोडेलोहारा, ता.तिरोडा, जि.भंडारा.

४२५. इंदिरा कृषी माध्यमिक विद्यालय, ठाणेगांव, ता.तिरोडा, जि.भंडारा.

४२६. निशांत विद्यालय, सिवनी, ता.आमगांव, जि.भंडारा.

४२७. विनोद विद्यालय, टेकेपार, ता.भंडारा, जि.भंडारा.

४२८. हरीभाई पटेल विद्यालय, खातीया, ता.गोंदिया, जि.भंडारा.

४२९. श्रीमती कमलादेवी स्वरूपचंद जैन कन्या शाळा, भंडारा.

४३०. आदिवासी विकास विद्यालय, झाशीनगर, ता.अर्जुनी-मोर, जि.भंडारा.

**जिल्हा : चंद्रपूर**

४३१. वनिता विद्यालय, पवनपार, ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर

४३२. प्रियदर्शनी माध्यमिक विद्यालय, गंगासागरहेटी, ता.नागभीड, जि.चंद्रपूर

४३३. श्री.शिवाजी विद्यालय, पेंढरी (कोकेवाडा), ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर.

४३४. आदर्श विद्यालय, काजळसर, ता.चिमूर, जि.चंद्रपूर.

४३५. पांडूरंग दहिकर विद्यालय, तळोधी नाईक, ता.चिमूर, जि.चंद्रपूर.

४३६. अरुणभाई झाडे विद्यालय, नांदेड, ता.नागभिड, जि.चंद्रपूर.

४३७. सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय, ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर (ता.चंद्रपूर)

४३८. हिंगलाज भवानी हायस्कूल, बाबुपेठ, ता.जि.चंद्रपूर.

४३९. महात्मा गांधी विद्यालय, नांदगाव-सूर्या, ता.कोरपना, जि.चंद्रपूर.

४४०. नितीन हायस्कूल, अड्याळ, ता.ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर.

**जिल्हा : गडचिरोली**

४४१. रेणुकाबाई उके विद्यालय, शिवराजपूर, ता.देसाईगंज, जि.गडचिरोली.

४४२. विवेकानंद विद्यालय, आरमोरी, ता.आरमोरी, जि.गडचिरोली.

४४३. महात्मा गांधी विद्यालय, गिलगाव. (जमी), ता.चामोर्शी, जि.गडचिरोली.

४४४. संतमानव दयाल विद्यालय, बामणी, ता.सिरोंचा, जि.गडचिरोली.

४४५. भगवंतराव हायस्कूल, टेकडा (तोल्ला), ता.सिरोंचा, जि.गडचिरोली.

४४६. भगवंतराव हायस्कूल, गोमणी, ता.मुलचेरा, जि.गडचिरोली.

४४७. प.पु.डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, देसाईगंज ता.देसाईगंज, जि.गडचिरोली.

४४८. सावंगी विद्यालय, सावंगी ता. देसाईगंज, जि. गडचिरोली.

**जिल्हा : वर्धा**

४४९. इंदिरा गांधी कन्या विद्यालय, अलीपूर, ता. हिंगणघाट, जि.वर्धा

४५०. माध्यमिक विद्यालय, महाकाळ, ता.जि.वर्धा

४५१. सौ.मीराबाई महंतरे माध्यमिक विद्यालय, काजळसरा, ता.हिंगणघाट, जि.वर्धा.

४५२. राणीबाई अग्निहोत्री विद्यालय, पवनुर, ता.जि.वर्धा.

४५३. नालंदा विद्यालय, सोरटा, ता.आर्वी, जि.वर्धा.

**जिल्हा : अमरावती**

४५४. श्रीमती लक्ष्मीबाई खडके विद्यालय, गुल्लरघाट, ता.जि.अमरावती.

४५५. आदिवासी मेळघाट उर्दू हायस्कूल, बैरागड, ता.जि.अमरावती.

४५६. महात्मा ज्योतिबा फुले मागासवर्गीय माध्यमिक विद्यालय, बैरागड, ता.जि.अमरावती.

४५७. माध्यमिक कन्या विद्यालय, मंगरुळ दस्तगीर, ता.तिवसा, जि.अमरावती.

४५८. स्व.त्र्यं. उर्फ बाबासाहेब गावंडे विद्यालय, सांगळूद, ता.दर्यापूर, जि.अमरावती.

४५९. माध्यमिक विद्यालय, बेलज, ता.चांदुर बाजार, जि.अमरावती.

४६०. उर्दू हायस्कूल, प्रथ्रोट, ता.अचलपूर, जि.अमरावती.

४६१. निदा उर्दू हायस्कुल, अमरावती ता.जि. अमरावती

४६२. जानी शैदा उर्दू हायस्कूल, शिराळा, ता.जि.अमरावती.

४६३. दत्तप्रभू माध्यमिक विद्यालय, कुष्टा बु., ता.जि.अमरावती.

४६४. महात्मा फुले विद्यालय, मार्कंडा, ता.जि.अमरावती.

४६५. जीवन विकास विद्यालय, खोपडा, ता.जि.अमरावती.

**जिल्हा : बुलढाणा**

४६६. महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, नांदरा कोळी, ता.जि.बुलढाणा

४६७. सहकार महर्षी स्वर्गीय भास्करराव शिंगणे विद्यालय, बोरजवळा, ता.खामगाव,जि.बुलढाणा

४६८. श्री.शंकरगिरी महाराज विद्यालय, पळशी, ता.जि.बुलढाणा.

४६९. छत्रपती शाहु महाराज विद्यालय, भूमराळ, ता.लोणार, जि.बुलढाणा.

४७०. महासिद्ध महाराज विद्यालय, धानोरा, ता.जळगाव-जामोद, जि.बुलढाणा.

४७१. सी.बा.पटेल विद्यालय, वडगाव गढ,ता.जळगाव-जामोद, जि.बुलढाणा.

४७२. स्व.नारायणराव वानखडे विद्यालय, आडसूळ, ता.जि.बुलढाणा

४७३. दादासाहेब बाहेकर उर्दू हायस्कूल, पातुर्डा, ता.जि.बुलढाणा

४७४. राजे संभाजी विद्यालय, आसोला-जहांगिर, ता.जि.बुलढाणा

४७५. नूतन विद्यालय, निमखेड, ता.जि.बुलढाणा

४७६. सावित्रीबाई फुले विद्यालय, भालगाव, ता.जि.बुलढाणा

**जिल्हा : अकोला**

४७७ . मातोश्री पार्वतीबाई नाईक कन्या शाळा, मंगरुळपीर, ता.मंगरुळपीर, जि.अकोला

४७८. सावित्रीबाई कन्या विद्यालय, कापसी रोड, ता.जि.अकोला.

४७९. नाथ विद्यालय मंगरुळपीर, ता.मंगरुळपीर, जि.अकोला.

४८०. बाबुसिंग राठोड विद्यालय, महागाव, ता.कारंजा, जि.अकोला.

४८१. मौलाना आझाद उर्दू हायस्कूल, अनसिंग, ता.जि.अकोला.

४८२. भाऊसाहेब गणगणे विद्यालय, बटवाडी, ता.जि.अकोला.

४८३. भारतीय ज्ञानपीठ विद्यालय, खिरपूरी, ता.जि.अकोला.

४८४. अंबामाता विद्यालय, गोरेगाव, ता.जि.अकोला.

४८५. श्रीराम चरणदास बाबा विद्यालय, फाळेगाव, ता.जि.अकोला.

४८६. महात्मा फुले विद्यालय, विझोरा, ता.जि.अकोला.

४८७ . राजीव गांधी विद्यालय, शेलगाव बोदाडे, ता.जि.अकोला

४८८. कानिफनाथ महाराज विद्यालय, सावरगाव, ता.जि.अकोला

४८९. स्व.आ.रामरावजी झनक विद्यालय, महागाव .ता.जि.अकोला

४९०. श्री तुकाराम शिरसाट विद्यालय, पिंप्री खु. ता.जी. अकोला

४९१. शाहबाबू उर्दू हायस्कूल, शिरपूर जैन, ता.जि.अकोला

४९२. नेकनाम उर्दू हायस्कूल, नरसींगपूर पंचगव्हाण, ता.जि.अकोला.

४९३. मस्तानियाँ उर्दू हायस्कूल, लोहारा, ता.जि.अकोला

४९४. सौ.सुमनताई मनतकर विद्यालय, तळेगांव डौला, ता.जि.अकोला.

४९५. स्वा.सौ. बाबुजी तायडे विद्यालय, आगीखेड, ता.जि.अकोला

४९६. मौलाना अ.कलाम आझाद उर्दू हायस्कूल, खेट्री, ता.जि.अकोला.

४९७. स्व.नामदेवराव घोगरे विद्यालय, भरतपूर, ता.जि.अकोला.

**जिल्हा : यवतमाळ**

४९८. यशवंतराव चव्हाण माध्यमिक विद्यालय,घाटाणा, ता.जि.यवतमाळ

४९९. स्व.किसनसिंग जितसिंग सिद्धु माध्यमिक विद्यालय, राजुरवाडी, ता.जि.यवतमाळ

५००. जवाहर माध्यमिक विद्यालय, भारी, ता.जि.यवतमाळ

५०१. डॉ. नंदूरकर विद्यालय, यवतमाळ, ता.जि.यवतमाळ

५०२. बापूसाहेब देशमुख माध्य.विद्यालय, जळका, ता.जि.यवतमाळ

५०३. माध्यमिक विद्यालय, पोखरी, इजारा, ता.जि.यवतमाळ

५०४ . ॲड.शंकरराव राठोड विद्यालय, लाखखिंड, ता.जि.यवतमाळ

५०५. डॉ.अल्लामा इकबाल उर्दू हायस्कूल, बाभुळगांव, ता.जि.यवतमाळ

५०६. वसंतराव नाईक विद्यालय, बोरी ई, ता.जि. यवतमाळ

५०७. स्व.माणिकराव पांडे पाटील माध्यमिक विद्यालय, कोल्ही, ता.जि.यवतमाळ

५०८. रविंद्रनाथ टागोर विद्यालय, मानकापूर, ता.जि.यवतमाळ

५०९. जगत विद्यालय, भवानी, ता.जि.यवतमाळ

५१०. बाबासाहेब देशमुख विद्यालय, साखरा खु.ता.जि.यवतमाळ

५११. राजीव विद्यालय, झरीजामणी, ता.जि.यवतमाळ

५१२. बाबा कंवलपोज उर्दू हायस्कूल, आर्णी, ता.जि.यवतमाळ

५१३. गुणवंतराव देशमुख उर्दू हायस्कूल, जांब बाजार, ता.जि.यवतमाळ

५१४. माणिकराव ठाकरे उर्दू हायस्कूल, पळशी, ता.जि.यवतमाळ

***नोट :** उपरोक्त विवरणपत्रामध्ये समाविष्ट असलेल्या ५२० शाळांपैकी फक्त विदर्भातील शाळांची यादी वर नमूद केली आहे.*

******

चर्चेला येत आहे. मागच्या अधिवेशनामध्ये हा प्रश्न सन्माननीय सदस्यांकडून लावून धरण्यात आला होता. आणि फार वेळपर्यंत या प्रश्नावर चर्चा झालेली आहे. त्यावेळेला माननीय सभापतींनी निदेश दिले, त्याप्रमाणे शासनाने सांगितले की, आम्ही त्याप्रमाणे वागू. **ज्या शाळांना अनुदान द्यायचे आहे, त्यांना वेळेवर द्यावे. कारण शिक्षकांना वेळेवर पगार मिळत नाहीत, ते फार अडचणीत आले आहेत.** या सगळ्या गोष्टी सन्माननीय सदस्यांनी मागच्या वेळेस सभागृहाच्या निदर्शनास आणल्या होत्या. त्या शिक्षकांना खरे तर अगोदरच मिळायला पाहिजे होते. १९९७ चे १९९७ ला पैसे मिळायला पाहिजे होते आणि १९९८ चे १९९८ ला मिळायला पाहिजे होते. ते पैसे त्यांना मिळत नाहीत म्हणून पुन्हा या प्रश्नावर चर्चा झाली. माझी विनंती आहे की, आपण सांगितल्यानंतरसुद्धा.. **पहिल्या निदेशाचे शासनाने पालन केले नाही. त्यानंतर आपण दुसरा निदेश दिला. त्यावर ते म्हणतात की लवकरात लवकर आम्ही पैसे देऊ, परंतु निदेश देऊ नका.** या ठिकाणी मा. मुख्यमंत्री बसलेले आहेत. माझी अशी अपेक्षा आहे की, ते या ठिकाणी जे काही चाललेले आहे त्याची त्यांना माहिती आहे. वित्तमंत्र्यांकडे या गोष्टीकडे जाण्याचे कारण नाही. मा. मुख्यमंत्री आहेत. इतका पैसा या शाळांना द्यावयाचा आहे, हे कोणीही मान्य करेल. यामध्ये काही विशेष नाही. तरी देखील वेळकाढूपणाचे धोरण शिवशाहीचे शासन करीत आहे. शिवशाही शासनाला दादा कोंडदेवांची परंपरा आहे. शिक्षकांनी केलेल्या कामाचे त्यांना पैसे मिळत नाहीत. मा.मुख्यमंत्री महोदयांनी वारंवार सांगितलेले आहे की, राज्याची आर्थिक स्थिती अतिशय चांगली आहे. त्यामुळे मा. मुख्यमंत्र्यांनी उठून याबाबतचे उत्तर द्यावे. पैसे देऊ असे मा. शिक्षणमंत्र्यांनी म्हटलेले असले तरीसुध्दा त्याचे ते पालन करत नाहीत. राहिलेल्या शिक्षकांचे पैसे १५ दिवसामध्ये दिले जातील असे मा. मुख्यमंत्र्यांनी सांगितले तर प्रश्न सुटेल तेव्हा त्यांनी याबाबतचे उत्तर द्यावे अशी मी आपल्याकडे विनंती करतो.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. सभागृहामध्ये सांगितलेले होते की, "**१ जून १९९७ पासुनचे अनुदान १४ कोटी, ४९ लाख, १९९७ पूर्वीचे अनुदान ११ कोटी, १९९८-९९ मधील ८ कोटी ७० लाख असे एकूण ३४ कोटी १९ लाख रुपये ३ महिन्यामध्ये सर्व संस्थांना देऊ**" असे २८ जुलै १९९८ ला सांगितले होते. त्यानंतर चर्चा झाली. शासन निर्णय आपण काढलेला आहे. निकष आपण ठरविलेले आहे. दोन दिवसामध्ये यादी जाहीर करतो असेही आता सांगण्यात आले त्याबद्दल मी जरूर आभारी आहे. यादी जाहीर करण्याचा तो प्रश्न संपलेला आहे. **या प्रकरणी मा. सभापती महोदयांनी त्यावेळी निदेश दिला तो मी वाचून दाखविला. त्यानंतर आपणही आता निदेश दिला** त्यामुळे आणखी बोलण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. माझे म्हणणे एकच आहे की, दोन दिवसामध्ये यादी टेबलवर ठेवणार आहात ती ठेवा व १५ दिवसात हे पैसे द्या अशाप्रकारचा सभापती महोदयांनी निदेश दिलेला आहे. आता मध्येच वित्त विभाग कोठे आला? त्यांच्याच संमतीने १०.२.८९ चा शासन निर्णय काढलेला आहे. त्यांचे पगार काढले जातात. अशा परिस्थितीमध्ये त्याबाबतचे कॅलक्युलेशन करता येत नाही काय? त्यांना कॅलक्युलेशन करता येत नसेल तर त्या संबंधीतांना आपण सस्पेंड करा. १५ दिवसात निधी उपलब्ध करून देण्याबाबतचा निदेश दिल्याप्रमाणे हा निधी उपलब्ध करून द्यावा, याबाबत विरोधी पक्ष नेत्यांनी विनंती केलेली आहे. **निदेश दिल्यानंतरही आपण काही करत नाही हे बरोबर नाही. त्याबाबत**

## नवीन पदे निर्माण करण्यावरील व नवीन वाहन खरेदीवरील बंधने

*महाराष्ट्र शासन : : वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक : बीजीटी १०९७/प्र.क्र.२४ अ/अर्थसंकल्प-१९*

***मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ : दिनांक १५ डिसेंबर १९९८***

वित्त विभाग क्र.बीजीटी-१०९७/प्र.क्र. २४ अ/अर्थसंकल्प-१९ दिनांक २ जून १९९८ च्या शासन निर्णयान्वये नवीन पद निर्मितीसाठी व रिक्तपदे भरण्यासंदर्भात बंधने घालण्यात आली होती. त्या संदर्भात येत असलेल्या अडचणीबाबत अनेक स्तरावरून शासनाकडे निवेदने प्राप्त झाली आहेत. सदर अडचणीबाबत विचार केल्यानंतर शासनाने दिनांक २ जून, १९९८ चा शासन निर्णय रद्द करण्याचा निर्णय घेतला असून, सुधारित आदेश खालीलप्रमाणे आहेत :-

**शासन निर्णय**

१) सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या आधिपत्याखालील विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांच्या कार्यालयात अस्तित्वात असलेल्या सर्व पदांचा आढावा घ्यावा व त्याबाबतचा **अहवाल वित्त विभागाच्या व्यय कार्यासनाकडे मान्यतेसाठी पाठवावा.**

२) या आढाव्याच्या अनुषंगाने अतिरिक्त ठरणाऱ्या कर्मचारीवर्गाची संख्या निश्चित करावी व ती कर्मचाऱ्यांची पदनिहाय संख्या सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागास कळवावी.

३) प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (र.व का.) यांच्यामार्फत मंत्रालयीन विभागांत अस्तित्वात असलेल्या पदांचा आढावा घेण्यात येईल व या आढाव्यानुसार **अतिरिक्त ठरणारा कर्मचारी वर्ग इतर विभागास आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागामार्फत केली जाईल.**

४) विभागांनी/कार्यालयांनी नवीन पद निर्मितीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे मंजुरीसाठी पाठविताना विविध विभागातून अस्तित्वात असलेली पदे कमी करून अनुरूप बचत दर्शविणे आवश्यक आहे. म्हणजे नवीन पद निर्मितीमुळे राज्य शासनाच्या तिजोरीवर जादा वित्तीय भार पडणार नाही.

५) नवीन पदे निर्माण करावयाच्या प्रस्तावामुळे जादा अधिकारी/कर्मचाऱ्यांची भरती करावी लागणार नाही. याची सर्व विभागानी दक्षता घ्यावी. अशी पदे विविध विभागांतून अधिकारी आणि कर्मचारीवर्ग कमी करूनच भरली पाहिजेत.

६) सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ रिक्त असलेली व व्यपगत झालेली पदे पुनरुज्जीवीत करावयाची असतील, तर त्यासाठी संबंधित विभागांनी योग्य ते समर्थन देऊन तसे प्रस्ताव दि. ७ जुलै १९९७ च्या वित्त विभागाच्या आदेशानुसार निर्माण करण्यात आलेल्या मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीपुढे सादर करावेत. सदर समितीने घेतलेल्या निर्णयानुसार या प्रस्तावाबाबत कार्यवाही करावी.

७) **सेवानिवृत्ती, पदोन्नती इत्यादी कारणांमुळे रिक्त होणारी पदे सहा महिन्यांच्या आत विभागांनी व कार्यालयांनी विहित पद्धतीनुसार भरतीच्या प्रक्रियेस यापुढे स्थगिती नाही.** मात्र ही पदे भरतांना त्याचे आवश्यकतेबद्दल खात्याच्या सचिवांची मान्यता आवश्यक राहील.

८) प्रकल्पग्रस्त, अपंग, अंध, मूक-बधिर, स्वातंत्र्य सैनिकांचे वारस व सन १९९१ चे कार्यमुक्त जनगणना कर्मचारी आणि अंशकालीन कर्मचारी यांच्या संदर्भात सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी ज्या सूचना निर्गमित केलेल्या आहेत त्या सूचना यापुढील पदे भरताना लागू आहेत.

९) **सर्व महाविद्यालये, शिक्षण व प्रशिक्षण संस्थामध्ये प्रपाठक, अधिव्याख्याता, तसेच शिक्षकवर्ग इत्यादी शैक्षणिक व्याख्याने देण्याचे काम करणाऱ्या पदावर नियमित स्वरुपात नियुक्ती न करता मानसेवी प्रपाठक अधिव्याख्याता व शिक्षकवर्ग इत्यादी याची नियुक्ती करावी.** त्यांना पूर्णवेळ नियुक्त न करता, व्याख्यानाच्या संख्येच्या आधारे मानधन द्यावे. मानधन देण्याच्या प्रस्तावास वित्त विभागाची मान्यता घ्यावी.

१०) नगरपाल व इतर पदाधिकारी यांना चिन्हांकित केलेल्या वाहनांसाठी कंत्राटी पद्धतीने आवश्यक कालावधीसाठी ठोक रकमेच्या पगारावर वाहन चालकाची नियुक्ती करावी. वाहन चालकांना ठोक रक्कम देण्याच्या प्रस्तावास वित्त विभागाची मान्यता घ्यावी.

११) प्रशासकीय विभागांनी आणि त्यांच्या आधिपत्याखालील कार्यालयांनी पुढील आदेश होईपर्यंत कोणत्याही प्रकारच्या नवीन वाहनांची खरेदी करू नये वाहनांची ज्या ज्या वेळी निकड भासेल त्या त्या वेळी ती फक्त ठराविक कालावधीसाठीच भाड्याने घेण्यात यावीत. पूर्णतः निकामी झालेली वाहने बदलतांना सुद्धा शक्यतो त्याच्या बदली भाड्याने वाहने घेऊनच वापर करावा. ज्या पदाच्या स्वरुपामुळे शासकीय वाहन आवश्यक असेल अशा पदाचे निकामी झालेले वाहन बदलण्यासाठी शासनाकडे मंजुरी प्रस्ताव पाठवावेत.

२) हे आदेश मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील मंडळे/महामंडळे/उपक्रम अशा सर्व प्रकारच्या सार्वजनिक उपक्रमांनासुद्धा लागू राहतील. मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी हे आदेश त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व सार्वजनिक उपक्रमांच्या निदर्शनास आणावेत.

३) हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(रवि भू. बुद्धीराजा)**
शासनाचे प्रधान सचिव (वित्त)

सांगा?

**श्री.सुधीर जोशी :** सभापती महोदय, या ठिकाणी मा. सभापती महोदयांनी आदेश दिलेला होता ही गोष्ट खरी आहे परंतु तो आदेश आम्हाला पाळता आलेला नाही. तेव्हा पुन्हा आपण आदेश १५ दिवसामध्ये निधी उपलब्ध करून द्या असा दिला त्यामुळे आमची पंचाईत झालेली आहे....

**श्री.बी.टी.देशमुख :** पहिला निदेश पाळता आला नाही म्हणून आपण दिलगिरी तरी व्यक्त करा.. **काय बोलत आहात आपण ? राज्याचे मा. मुख्यमंत्री येथे बसलेले आहेत. कसे काय राज्य चाललेले आहे हे ? सभापती महोदयांनी तीन महिन्यात या सर्व संस्थांना निधी द्या अशाप्रकारचे निदेश दिल्यानंतरही सहा महिने झाले तो निदेश पाळला जात नाही. याबाबत आपण निदान दिलगिरी तरी व्यक्त करायला पाहिजे.** एका शब्दाने तरी त्यांनी दिलगिरी व्यक्त केली पाहिजे. हे ५ हजार लोक आपल्याला काय म्हणणार? ही गोष्ट बरोबर नाही. माझे म्हणणे असे आहे की दोन दिवसांमध्ये यादी ठेवण्याचे आपण सांगितले त्याबद्दल सभापती महोदय, मी आपला आभारी आहे. निकष पूर्ण केल्यानंतर त्याची यादी जाहीर होण्यास १५-१५ महिने लागतात. या लोकांना १५ दिवसांमध्ये अनुदान मिळाले पाहिजे या संबंधी आपण आदेश दिलेला आहे. **सुधीरभाऊ आता आम्हाला तुमचे उत्तर नको आहे. मी मा. मुख्यमंत्र्यांना विचारू इच्छितो की, या ठिकाणी मा. सभापतींच्या आदेशांची अंमलबजावणी होणार आहे की नाही?**

**श्री.सुधीर जोशी :** अध्यक्ष महाराज...

**श्री.बी.टी.देशमुख :** हे बरोबर नाही. मा. मुख्यमंत्र्यांनी याचे उत्तर दिले पाहिजे, अशी आमची मागणी आहे.

**श्री.प्रमोद नवलकर :** अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सदनाचे कामकाज सभापती म्हणून आपण चालवित आहात. या सदनामध्ये कोणी उत्तर द्यायचे याचा आदेश मा. सदस्यांनी द्यायचा नसतो तर तो आपणच द्यायचा असतो.

**श्री.बी.टी.देशमुख :** मला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. **त्यांनी उत्तर द्यावे अशी मागणी करण्याचाही अधिकार आहे. मा. मुख्यमंत्र्यांचा बसून राहण्याचा किंवा उत्तर न देण्याचा अधिकार मी अमान्य करीत नाही.** सभापती महोदय, आपण जे निदेश दिले त्याची अंमलबजावणी १५ दिवसांमध्ये होणार आहे की नाही हे कोणीही सांगू दे. मा. राज्यमंत्र्यांनी सांगितले तरी चालेल.

**श्री.मनोहर जोशी :** सदर प्रश्न शालेय शिक्षकांना अनुदान देण्यासंबंधीचा आहे. या सभागृहातील यावरील चर्चा मी ऐकत आहे. या चर्चेवरून मला जी माहिती मिळालेली आहे त्या प्रमाणे अनुदान देण्याचा आदेश झालेला होता. मा. मंत्री महोदयांनी तो आदेश दिल्याचे मान्य केले होते. **त्या संबंधीची पूर्तता का झाली नाही याची माहिती आता माझ्याजवळ नाही.** मा. मंत्रीमहोदयांनी या बाबत निवेदन करताना सभागृहात सांगितले होते की, या संबंधी निधी उपलब्ध झाल्यानंतर पैसे देण्याच्या बाबतीत व्यवस्था करू शकू. निधी देण्याची जबाबदारी त्या खात्याला पैशांची जी ॲलॉटमेंट झालेली असते, त्याच्यावर अवलंबून असते. **शासनाच्या वतीने या कामासाठी अधिक निधी उपलब्ध करून देणे हे देखील शक्य आहे.** मा. मंत्री महोदयांनी आपण आदेश दिल्यानंतर तो पाळावा या भावनेने आपले मत व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, आपण मला दिवसांची मुदत देऊ नका. निधी किती आहे हे पाहून मी निवेदन करीन.

त्यांनी या ठिकाणी प्रामाणिकपणे जे निवेदन केले त्या संबंधी गैरसमज होण्याची आवश्यकता नाही. सभापती महोदय, आपण कोणतेही आदेश दिले तरी मुख्यमंत्री या नात्याने मी उभा राहून निश्चितपणे उत्तर देईल. **मा. मंत्री महोदय श्री नवलकर यांनी सांगितले त्या प्रमाणे मुख्यमंत्र्यांनीच उत्तर दिले पाहिजे असा आग्रह धरणे हे बरोबर नाही. मा. सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांना त्याची निश्चितच कल्पना आहे. पण ती अपेक्षा करणे हे मी समजू शकतो आणि म्हणूनच मी उत्तर देण्यासाठी उभा राहिलो आहे.** या बाबतीत खात्याकडे असलेली तरतूद पहावी लागेल. हा निधी जर आपल्याकडे उपलब्ध नसेल तर तो उपलब्ध करून देण्यासाठी शासनामार्फत प्रयत्न करता येतील. या शाळांना अनुदान देण्यामध्ये विलंब झालेला आहे हे लक्षात घेऊन या शाळांतील शिक्षकांना पैसे लवकरच मिळाले पाहिजेत यामध्ये शंका नाही. या ठिकाणी माहितीविना उत्तर देणे बरोबर नाही. **या संबंधीची माहिती घेऊन पुढच्या आठवड्यामध्ये या बाबत सभागृहामध्ये निवेदन करण्याची माझी तयारी आहे.** त्या वेळी आपण पुन्हा प्रश्न विचारले तर पुन्हा माहिती देण्याची माझी तयारी आहे.

******

# नवीन माध्यमिक शाळांना अनुदान उपलब्ध करून देणे.

*महाराष्ट्र विधानपरिषद :* *: तिसरे अधिवेशन १९९८*

*गुरुवार, २४ डिसेंबर १९९८*

*नवीन माध्यमिक शाळांना अनुदान उपलब्ध करून देणे याबाबत मा. सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार मा. मुख्यमंत्र्यांनी केलेले निवेदन.*

**श्री. मनोहर जोशी (मुख्यमंत्री) :** अध्यक्ष महोदय, गेल्या आठवड्यामध्ये या सभागृहामध्ये एका प्रश्नावर चर्चा सुरू असतांना शाळांना दिल्या जाणाऱ्या अनुदानाचा प्रश्न उपस्थित झाला होता. त्याच्यासंबंधी मी या प्रश्नाचा अभ्यास करून या संबंधीचे निवेदन करीन असे आश्वासन श्री.बी.टी.देशमुख साहेबांना आणि इतर सदस्यांना दिले होते. ते निवेदन करण्यासाठी मी आपल्या अनुमतीने या ठिकाणी उभा आहे.

**मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन**

दिनांक १७ डिसेंबर, १९९८ रोजी निकषानुसार पात्र ठरणाऱ्या नवीन माध्यमिक शाळांना अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत विधान परिषदेत उपस्थित केलेल्या चर्चेच्या वेळी सन्माननीय सदस्यांनी, मा. सभापती, विधान परिषद यांनी दिनांक २८ जुलै, १९९८ ला दिलेल्या आदेशाचे पालन करून नवीन माध्यमिक शाळांना अनुदान ३० दिवसांच्या आत मंजूर करता येईल काय, अशी विचारणा केली. त्यावर मा. मंत्री, शालेय शिक्षण यांनी तारखेचे बंधन न घालता लवकरात लवकर अनुदान मंजूर करण्यास शासनाला परवानगी द्यावी, अशी विनंती मा. सभापती यांनी केली. यावर मा. मुख्यमंत्री यानी, माध्यमिक शाळांच्या अनुदानाच्या प्रश्नाबाबत शालेय शिक्षण विभागाकडून माहिती प्राप्त करून घेऊन पुढील आठवड्यात विधान परिषदेत निवेदन केले जाईल, असे सांगितले.

(१) शासन निर्णय , क्रमांक : एसएसएन - १०८८/१६६९-एन) माशि-१, दिनांक १० फेब्रुवारी, १९८९ अन्वये सन १९८८-८९ पासून विनाअनुदानित माध्यमिक शाळा (इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त) टप्प्याटप्प्याने अनुदान तत्त्वावर आणण्यांत येतात. यानुसार शाळेची तपासणी झाल्यानंतर ती अनुदानास पात्र ठरल्यास ४ थ्या वर्षी २५ टक्के, ५ व्या वर्षी ५० टक्के, ६ व्या वर्षी ७५ टक्के व ७ व्या वर्षी १०० टक्के अनुदानावर आणण्यांत येते. आदिवासी क्षेत्रातील शाळा व मुलींच्या शाळा यांना ४ थ्या वर्षी १०० टक्के अनुदान दिले जाते.

(२) सन १९९७-९८ पासून ज्या शाळा अनुदानावर आणण्यासाठी पात्र आहेत त्यांना अनुदान देण्यासाठी **अंदाजे रुपये २४ कोटी व सध्याच्या शाळांना अनुदान देण्यासाठी अंदाजे रुपये १२ कोटी अतिरिक्त तरतूद म्हणजे एकूण अंदाजे रुपये ३६ कोटी तरतूद आवश्यक आहे.**

(३) १९९७-९८ साली ५२० शाळा अनुदानास पात्र झाल्या आहेत. पात्र ठरलेल्या ह्या ५२० माध्यमिक शाळांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आली आहे. या ५२० शाळांना अनुदान देण्यासाठी तरतूद करण्यांत आली असून, **अंदाजे रुपये २६ कोटी इतके अनुदान दिनांक ३१ मार्च, १९९९ पर्यंत वितरीत करण्यात येईल.**

(४) १९९८-९९ या वर्षी अनुदानास पात्र होणाऱ्या अंदाजे ५०० शाळांच्या बाबतीत निर्धारण करण्यांत येत असून, **निर्धारण पूर्ण झाल्यानंतर अनुदान देण्यांत येईल. त्यासाठी अंदाजे रुपये १० कोटी तरतूद उपलब्ध करून दिली जाईल.**

**NUTA BULLETIN** (Fortnightly Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **PUBLISHER : Prof. V.K. Pande,**7,Yeshwant Appartments Laxmi Nagar,**WARDHA-442 001.** Composed at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Offset Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. ATI 83 Licenced to post without prepayment **LICENCE NO. ATI 10** Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **05 - 01 - 1999**

**if Undelivered please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

To,.......................................................................
.......................................................................
.......................................................................